पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड,
प्रेमलोक पार्क, चिंचवड, पुणे
दुरध्वनी क्रमांक ०२०-२७३५०१२०
ई मेल आयडी - cro.pcpc-mh@gov.in



# पिंपरी चिंचवड पोलीस शिपाई भरती प्रक्रिया २०२४-२०२५
# लेखी परिक्षेबाबत.

## -: उमेदवारांना महत्वाच्या सुचना :-

पिंपरी चिंचवड पोलीस दलाच्या आस्थापनेवर सन २०२४-२०२५ मध्ये रिक्त असलेल्या ४६२ पोलीस शिपाई पदांकरिता दिनांक ११/०२/२०२६ ते २६/०२/२०२६ या कालावधीत मैदानी चाचणी घेण्यात आलेली आहे. सदर चाचणीमध्ये गुणवतेनुसार व रिक्त पदांच्या १:१० प्रमाणे लेखी परिक्षेसाठी एकुण ५६७६ पात्र असलेल्या उमेदवारांची यादी दिनांक २८/०२/२०२६ रोजी या कार्यालयाच्या https://www.pcpc.gov.in तसेच मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर उमेदवारांच्या माहितीस्तव प्रसिध्द करण्यात आली आहे.

**सदर यादीतील पात्र झालेल्या उमेदवारांची लेखी परिक्षा श्री. बालाजी विद्यापीठ, पुणे ५५/२-७, ताथवडे, मुंबई बँगलोर बायपास हायवे, ताथवडे, पुणे ४११०३३ या ठिकाणी दिनांक १५/०३/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात येणार आहे.**

## महत्वाच्या सुचना :-

१. उमेदवार परीक्षा केंद्रात प्रवेश करतांना त्याचेजवळ मैदानी चाचणीच्यावेळी देण्यात आलेले प्रवेश पत्र व लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र असे दोन्ही प्रवेशपत्र उमेदवाराकडे असतील तरच त्यास परीक्षा केंद्रात प्रवेश दिला जाईल. **तसेच, स्वतःचे पासपोर्ट आकाराचे प्रवेशपत्रामध्ये नमूद केलेल्या फोटोच्या दोन प्रती उमेदवाराने सोबत आणणे आवश्यक राहील.**

२. उमेदवारांस लेखी परिक्षेकरीता काळया शाईचा बॉल पॉईंट पेन व लेखनासाठी पॅड उपलबध करुन देण्यात येणार असल्याने उमेदवारांनी त्यांचे प्रवेशपत्र आणि पासपोर्ट साईज फोटो हया शिवाय उमेदवाराकडील इतर कोणतीही वस्तु/साहित्य उदा.पेन, पेन्सिल, खोडरबर परिक्षा केंद्रावर नेण्यास प्रतिबंध आहे. अन्यथा लेखी परीक्षेसाठी प्रवेश दिला जाणार नाही.

३. लेखी परीक्षा ९० मिनिटांची व १०० गुणांसाठी आहे. परीक्षा मराठी भाषेत घेण्यात येईल.

४. **उमेदवारांना परीक्षा केंद्रावर दोन तास परिक्षा सुरु होण्यापुर्वी प्रवेश दिला जाईल.**

५. प्रस्तुत उत्तरपत्रिका ही कॉर्बनलेस ( Carbonless OMR Sheet ) या प्रकारातील असून, दोन प्रतित असेल. परीक्षेचा कालावधी संपेपर्यत उत्तरपत्रिकेचा भाग-२ मूळ उत्तर पत्रिकेपासून कोणत्याही परिस्थितीत वेगळा करु नये.

६. (OMR Sheet) वर नमूद केलेल्या सूचनांचे उमेदवारांनी काटेकोरपणे पालन करावे.

७. परीक्षा कालावधी संपल्यानंतर उत्तरपत्रिका पर्यवेक्षकाकडे जमा करण्यापूर्वी उत्तरपत्रिकेचा भाग-२ मूळ उत्तरपत्रिकेपासून विहीत केलेल्या ठिकाणी व्यवस्थितपणे फाडून वेगळा करावा. परीक्षेनंतर उत्तरपत्रिकेचा भाग २ सोबत घेऊन जाण्याची उमेदवारांना परवानगी आहे.

८. उत्तरपत्रिकेवर एकापेक्षा अधिक वर्तुळे छायांकित केल्यास अशा उत्तरास गुण दिले जाणार नाहीत.

९. (OMR Sheet) वर कोणतेही चिन्ह नमूद करु नये /नाव लिहू नये/ खाडाखोड अथवा पुनर्लेखन करु नये, तसे आढळून आल्यास त्या उमेदवारास भरती प्रक्रियेतून बाद ठरविण्यात येईल.

१०. उमेदवार कॉपी करताना आढळून आल्यास त्याच्या विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच त्यास भरती प्रक्रियेतून बाद ठरवून त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

११. परीक्षा केंद्रात एकदा प्रवेश केलेल्या उमेदवारास परीक्षा संपेपर्यत बाहेर जाण्यास सक्त मनाई राहील.

१२. परीक्षा केंद्रात भ्रमणध्वनी (मोबाईल फोन) / डिजीटल डायरी/मायक्रोफोन/मायक्रो कॅमेरा डिव्हाईस/ कॅलक्युलेटर/डिजीटल नोट पॅड/नोटस /पुस्तके/ईअर फोन/ हिअरिंग एड डिव्हाईस/ स्मार्ट वॉचेस, स्मार्ट आय ग्लासेस इत्यादी तसेच इतर कुठलेही असे साहित्य, ज्याचा कॉपी करण्यासाठी उपयोग होऊ शकतो असे कोणतेही इलेक्ट्रॉनिक साहित्य आणण्यास सक्त मनाई आहे. असे करणारा उमेदवार आढळून आल्यास त्यास त्याच क्षणी बाद ठरवून त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल. तसेच कसुरदाराविरुध्द महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा ( अनुचित मार्गास प्रतिबंध) अधिनियम २०२४ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

१३. सूचना देवूनही लेखी परीक्षेस उपस्थित राहीलेल्या उमेदवारांने संगनमताने परिक्षेच्या ठिकाणी स्वतःचे बदली डमी उमेदवार परीक्षा देणेस बसविल्याचे आढळून आल्यास असे उमेदवार, डमी व्यक्ती तसेच सहकार्य/मदत करणारे व्यक्ती यांचे विरुध्द त्वरीत कायदेशीर गुन्हा दाखल करण्याबाबतची कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१४. परीक्षा केंद्रावर गैरप्रकारास आळा घालण्यासाठी उमेदवारांचे फोटोग्राफी / जवळून रोल नंबरसह व्हीडीओ शुटींग करण्यात येणार आहे.

१५. लेखी परीक्षा केंद्राचे आवार व परीक्षा केंद्राचे वर्ग हे सि.सि.टी.व्ही. निगराणीखाली रहाणार आहे.

**ठिकाण :-** पिंपरी चिंचवड
**दिनांक :-** १२/०३/२०२६.

12/3/26.
**( सारंग आवाड )**
अपर पोलीस आयुक्त, तथा
भरती समिती अध्यक्ष
पोलीस आयुक्तालय, पिंपरी चिंचवड

## परिक्षा केंद्राचे गुगल मॅप

**श्री. बालाजी विद्यापीठ, पुणे ५५/२-७, ताथवडे, मुंबई बँगलोर बायपास हायवे, ताथवडे, पुणे ४११०३३**